सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ५ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

नाव – शैलेश भाउराव बेले,

वय – ४७ वर्ष, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.नं.२१९,

राहणार – पो.स्टे. बुटीबोरी, जिल्हा – नागपुर.

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

१. मी २०१७ पासुन २०२३ पर्यंत मौदा पोलीस स्टेशनला कार्यरत होतो. दिनांक ११.६.२०२१ रोजी माझी डयुटी पोलीस स्टेशनला स्टेशन डायरीवर लागली होती. मी स्टेशन डायरी डयुटीवर असतांना सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर यांनी एक लेखी तक्रार पोलीस स्टेशनला आणुन दिली. सदरची फिर्याद हेमराज समर्थ आणि निलेश नागपुरे नावाच्या व्यक्तींनी त्यांची फसवणूक झाल्याबद्दल केली होती. सदर लेखी तक्राराची चौकशी सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर साहेबांनी केली होती आणि चौकशी अहवाल स्टेशन डायरीमध्ये गुन्हा दाखल करण्याकरिता दाखल केला होता. त्यांनी तक्रार दिली होती की, एका व्यक्तीने त्याचे नाव आशिष बारेकर असल्याचे व तो पोलीस असल्याचे सांगुन पोलीसांचे गणवेश परिधान करुन औरंगाबाद येथे चालक या पदावर पोलीस पथकात लावुन देण्यासाठी प्रत्येकी तिन लाखाची त्यांच्याकडुन मागणी केली होती व त्यामध्ये प्रत्येकी दोन लाख रुपये देवुन आरोपी त्यांना नौकरीवर लावुन देईल असे ठरले होते. त्या लोकांमध्ये पैशांची देवाणघेवाण दिनांक १०.५.२०२१ रोजी दिवाणी व फौजदारी न्यायालय, मौदा च्या भाडयाच्या इमारतीसमोर झाली. आरोपी त्या दोघांपैकी एकाला त्याच्यासोबत भंडारा येथे घेवुन गेला होता. त्या व्यक्तीला आरोपीने तिकिट आणायला पाठविले व आरोपी तेथुन निघुन गेला. त्यानंतर फिर्यादी व त्याचा मित्र पोलीस स्टेशनला फिर्याद द्यायला आले व लेखी स्वरुपात फिर्याद दिली. सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर साहेबांनी त्यांची फिर्यादच्या अनुषंगाने चौकशी करुन

चौकशी अहवाल मला सादर केला. त्या अनुषंगाने अपराध क्रमांक २९४/२०२१ भा.द.वि. चे कलम ४२०, ४१९, १७०, १७१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यावेळेस फिर्यादी हेमराज समर्थ हा पोलीस स्टेशनला हजर असल्याने फिर्यादवर त्याची सही घेतली. आता मला दिनांक १०.५.२०२१ रोजी फिर्यादीने दिलेली नि.क्र.२६ वरील फिर्याद दाखविण्यात आली. सदरची फिर्याद पोलीस नाईक कोमल कडू ब.नं.१७९४ यांनी नोंदविली होती.

२. आता मला सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर साहेबांनी सादर केलेला अहवाल दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर साहेबांची सही आहे. मी त्यांच्यासोबत काम केले असल्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. आता मला सदर अहवालाच्या अनुषंगाने नोंदविण्यात आलेली तक्रारीची छापील वर्दी दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर दाखल अधिकारी म्हणुन माझी सही आहे. तसेच फिर्यादी हेमराज समर्थची देखील सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक पी ४२** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीद्वारे –**

३. मी फक्त फिर्याद दाखल केली होती. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरिक्षक सतिश सोनेकर साहेबांनी केला होता. मी घटनेच्यावेळेस मोहरर असल्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल मी मालखान्यात जमा केला होता याबद्दल माझ्या सहयांच्या दिनांक ६.१२.२०२१ रोजीच्या दोन मुद्देमाल पावत्या अभिलेखावर दाखल आहेत. आता मला सदरच्या पावत्या दाखविण्यात आल्या. त्या त्याच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदरच्या मुद्देमाल पावत्या उलटतपासादरम्यान साक्षदाराला दाखविल्यामुळे व त्यांनी त्यातील मजकुर मान्य केल्यामुळे त्यांना एकत्रीतरित्या **निशानी क्रमांक पी ४३** देण्यात येत आहे). मी दाखल केलेल्या मुद्देमालाचा क्रमांक १४८ होता. त्यावेळेस मी तिस हजार रुपये नगदी, आधार

कार्ड, मोबाईल व इतर काही साहित्य जमा केले होते. बाकीचे साहित्याचा तपशील मला आठवत नाही. सदर मुद्देमाल मी कोणत्या तारखेला मालखान्यात जमा केला ते मला आठवत नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही. समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक ०८.११.२०२३ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा